# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी





टॅकनीड माशी

**यजमान किडी :** पतंगवर्गीय किडीच्या अळया


• कृषि माहिती वाहिनी : (02452) 229000 ई-मेल : deevnmkv@gmail.com • फोन : (02452) 228601

• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापिठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv


## ११ नोव्हेंबर २०२३ — आश्विन/कार्तिक शके १९४५

| वार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | **५** आश्विन कृ. ८ शुभ दिवस, कालाष्टमी | **१२** आश्विन कृ. १४, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन सायं. ५.३१ ते ८.०६ पर्यंत, अमावास्या प्रारंभ दुपारी ०२.४४ | **१९** कार्तिक शु. ६/७ | **२६** कार्तिक शु. १४, पौर्णिमा प्रारंभ दुपारी ०३.५३ |
| सो सोमवार | | **६** आश्विन कृ. ९ | **१३** आश्विन अमावास्या, दर्श अमावास्या, सोमवती अमावास्या दुपारी ०२.५६ पर्यंत, अमावस्या समाप्ती दु. ०२.५६ | **२०** कार्तिक शु. ८ शुभ दिवस, दुर्गाष्टमी (सायं. ४.१९ नं.) | **२७** कार्तिक पौर्णिमा शुभ दिवस, गुरू नानक जयंती (दु.१.३५ नं.)  पौर्णिमा समाप्ती दुपारी ०२.४५ |
| मं मंगळवार | | **७** आश्विन कृ. १० | **१४** कार्तिक शु. १, बलिप्रतिपदा, दीपावली पाडवा, कार्तिक मासारंभ, गोवर्धन पूजन, बालदिन  | **२१** कार्तिक शु. ९ शुभ दिवस | **२८** कार्तिक कृ. १ शुभ दिवस, महात्मा जोतिबा फुले पुण्यतिथी |
| बु बुधवार | **१** आश्विन कृ. ४ शुभ दिवस, संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०८.२५ | **८** आश्विन कृ. १० | **१५** कार्तिक शु. २, भाऊबीज | **२२** कार्तिक शु. १० | **२९** कार्तिक कृ. २ शुभ दिवस |
| गु गुरूवार | **२** आश्विन कृ. ५, औद्योगिक सुरक्षा दिन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी | **९** आश्विन कृ. ११ शुभ दिवस, रमा एकादशी (सायं. ४.४६ नं.), वसुबारस | **१६** कार्तिक शु. ३, विनायक चतुर्थी | **२३** कार्तिक शु. ११ शुभ दिवस, प्रबोधिनी एकादशी (स.१०.०२ प.), पंढरपूर यात्रा | **३०** कार्तिक कृ. ३, संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०८.०४ |
| शु शुक्रवार | **३** आश्विन कृ. ६ शुभ दिवस | **१०** आश्विन कृ. १२, प्रदोष, धनत्रयोदशी, धन्वंतरी जयंती | **१७** कार्तिक शु. ४, लाला लजपतराय पुण्यतिथी | **२४** कार्तिक शु. १२ शुभ दिवस, प्रदोष (स.९.०४ प.), तुलसीविवाहारंभ | |
| श शनिवार | **४** आश्विन कृ. ७ शुभ दिवस (स.११.५९ नं.) | **११** आश्विन कृ. १३, शिवरात्री | **१८** कार्तिक शु. ५ शुभ दिवस | **२५** कार्तिक शु. १३ शुभ दिवस | |

### या महिन्यातील करावयाची कामे

- खरीप ज्वारी व बाजरीची कापणी करून उतारास आडवी नांगरट करावी.
- बागायती हरभऱ्यासाठी पेरणी १५ नोव्हेंबरपर्यंत करावी.
- बागायती गव्हाचे एचडी-२२७८, एचडी-२१८९ हे वाण २० नोव्हेंबर पर्यंत पेरावेत. उशीरा पेरावयाच्या गव्हासाठी एचडी-२३८०, एचडी-२१८९, कैलास व पीबीएन-५१ हे वाण पेरावेत.
- गव्हास पेरणीच्या वेळी शिफारस केलेले नत्र, स्फूरद व पालाश द्यावे. (१००:५०:५०कि./हे)
- हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५%, ४ ग्रा १० लिटर पाण्यातून फवारावे.
- बागायती हरभऱ्यास व करडईस पेरणीनंतर ४५ दिवसांनी पहिले पाणी द्यावे.
- सूर्यफुलास बोंडी लागते वेळी व फुलोऱ्यात असताना ३० दिवसांनी हेक्टरी ३० किलो नत्र द्यावे.
- पूर्वहंगामी उसाची लागवड या महिन्यात संपवावी.
- टोमॅटो, फुलकोबी, पानकोबी, कांदा या भाजी पाल्याच्या रोपांची पूर्नलागवड करावी.
- तुरीवरील घाटे अळी व शेंगमाशीच्या नियंत्रणासाठी ल्युफेन्युरॉन ५.४ ई.सी. २ मिली व डायमेथोएट ३० %, १३ मिली पाण्यातून फवारावे.

महत्त्वाच्या नोंदी






संत नामदेव सेवाभावी संस्था, हिंगोली संचलित

**कृषि महाविद्यालय, तोंडापूर**

ता.कळमनुरी जि.हिंगोली

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नीत

मा.खा.ॲड. शिवाजीराव माने

अध्यक्ष

College Code 11161

* संपर्क *

प्राचार्य डॉ.व्ही.ओ.बोंढारे मो. : 9890877576 | प्रा.एन.डब्ल्यु. माळोदे मो. : 9657936736 | डॉ.एस.एम.पाचपुते मो. : 9405897306 | प्रा.एस.एन.वाढवे मो. : 9970783979

# रबी कांदा लागवड

नोव्हेंबर २०२३

**डॉ.जि.एम.वाघमारे**
विभाग प्रमुख
मो. : ७५८८५३७६९६

**डॉ.एस.जे.सय्यद**
वरिष्ठ संशोधन सहाय्यक

**डॉ.एस.ए.जावळे**
कृषि सहाय्यक
मो. : ७५८८१५५४४९

उद्यान विद्या विभाग, व.ना.म.कृ.वि., परभणी

कांद्यामध्ये औषधी गुणधर्म आहेत. कांदा उत्तेजक, चेतनाप्रद असून त्यात गोड, आंबट, तिखट, कडवट आणि तुरट पाच निरनिराळे स्वाद आहेत. पित्त आणि वातशामक म्हणून कांद्याचा वापर केला जातो. थकवा, मरगळ, उष्माघात आणि रक्तवाहिन्यांतील दोष या विकारांवर कांदा अत्यंत गुणकारी आहे. कांद्यामध्ये 'ब' आणि 'क' जीवनसत्त्वे, कर्बोहायड्रेट्स, प्रोटीन्स तसेच फॉस्फरस, कॅल्शियम आणि लोह ही खनिजे असतात. कांद्याला येणारा उग्र आणि तिखटपणा हा 'अलिल प्रोपिल डायसल्फाईड' या हवेत उडून जाणाऱ्या तेलकट पदार्थामुळे येतो. कांद्याचा लाला रंग हा 'अंथोसायनीन' या रंगद्रव्यामुळे येतो. कोशिंबीर, चटणी आणि मसाला तसेच केचप आणी सॉस यामध्ये कांद्याचा नेहमी वापर केला जातो. कांद्याची पावडर करून आणि कांद्याचे उभे काप किंवा चकत्या करून त वाळवून वर्षभर वापरता येतात. कांदा पिकविणाऱ्या राज्यात क्षेत्र व उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. महाराष्ट्रामध्ये नाशिक, पुणे, सोलापूर, जळगाव, धुळे, अहमदनगर सातारा जिल्ह्यांमध्ये कांद्याची लागवड केली जाते. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रात नव्हे तर सबंध भारतात कांदा पिकविण्यात प्रसिध्द आहे .

**जमीन व हवामान :** कांदा पिकासाठी हलक्या आणि मध्यम भारी जमिनी उपयुक्त ठरतात. कांद्याच्या लागवडीसाठी जमिनीचा सामू ६.५ ते ८.५ पर्यंत असावा. पाण्याचा निचरा असणारी भुसभूशीत व सेंद्रीय खतांनी परिपूर्ण असलेली मध्यम ते कसदार जमीन कांद्याला चांगली मानवते. कांद्याची वाढ जमिनीच्या वरच्या थरात होत असल्याने जमिनीचा वरचा थर भुसभुशीत असावा. कांद्याच्या मुळाभोवतीच्या जमिनीत भरपूर ओलावा आणि खेळती हवा असल्यास कांद्याची वाढ चांगली होते. यासाठी जमिनीच्या वरच्या थरात सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण भरपूर असावे. चोपण किंवा भारी काळ्या जमिनीत कांद्याची पालेवाढ जास्त प्रमाणात होते. मात्र कांदे त्या प्रमाणात पोसत नाहीत . याशिवाय चोपण किंवा काळ्या जमिनीत कांद्याचा आकार वेडावाकडा होतो .

कांदा हेक्टरी हिवाळी हंगामातील पीक असून महाराष्ट्रातील सौम्य हवामानात कांद्याची २ ते ३ पिके घेतली जातात. कांदा लागवडीपासून १ ते २ महिने हवामान थंड लागते. कांदा पोसायला लागताना तापमानातील वाढ कांदा वाढीस उपयुक्त असते. कांद्याची वाढ आणि बिजोत्पादन हे तापमान आणि सूर्यप्रकाशाचा कालावधी (लहान आणि मोठा दिवस) यावर अवलंबून असते. कांद्यामध्ये लहान दिवसांत वाढणाऱ्या (शॉर्ट डे) आणि मोठ्या दिवसांत वाढणाऱ्या (लाँग डे) दोन प्रकारच्या जाती असतात. म्हणूनच खरीप आणि रब्बी हंगामात लागवडीसाठी वेगवेगळ्या जाती निवडणे आवश्यक असते. लहान दिवसात वाढणाऱ्या जाती मोठ्या दिवसात चांगल्याप्रकारे वाढू शकतात . परंतु मोठ्या दिवसांत वाढणाऱ्या जाती लहान दिवसांत लावल्या तर त्याची फक्त पालेवाढ होते आणि कांदे चांगले पोसत नाहीत . दिवसाच्या लांबी एकत्रित विचार करून कांद्याला हवामान पोषक आहे किंवा नाही, हे ठरवावे लागते. इतकाच तापमानचादेखील कांदा पिकाच्या वाढीवर परिणाम होतो. त्यामुळे दिवसाची लांबी आणि तापमान याचा कांदा पिकाच्या लागवडीनंतर गाठ थोडी मोठी होत असताना १२ ते १५ अंश सेल्सिअस, कांदा पोसत असताना १५ ते २० अंश सेल्सिअस आणि कांदा काढणीच्या वेळी २५ ते ३० अंश सेल्सिअस असे तापमान कांद्याच्या वाढीला अनुकूल असते.

**पूर्वमशागत व लागवड हंगाम :**

जमिनीची उभी आडवी नांगरणी करून कुळवाचे पाळया देऊन ढेकळे फोडून जमीन भूसभुशित करावी . जमिनीत हेक्टरी ४० ते ५० टन शेणखत मिसळावे . महाराष्ट्रात कांद्याची लागवड खरीप हंगामात जून ते ऑक्टोबर, रबी हंगामात नोव्हेंबर ते फेब्रुवारी आणि उन्हाळी हंगामात जानेवारी ते जून महिन्यात करतात .

**बियाण्याचे प्रमाण व लागवड :** हेक्टरी कांद्याचे १० किलो बियाणे पुरेसे असते, कांद्यांची रोपे , गादी वाफे तयार करणा–या क्षेत्राची खोल नांगरट करून कुळवाच्या दोन–तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशित करावी. गादी वाफा १ मी रूंद ३ मी लांब १५ सेमी उंच करावा. वाफ्यातील ढेकळे निवडून बाजूला काढावीत. वाफ्याच्या रूंदीशी समांतर अशा ५ सेमी बोटाने रेषा पाडाव्यात आणि यात बी ओळीत पातळ पेरावे व नंतर मातीने झाकून टाकावे. बी उगवून येईपर्यंत झारीने पाणी घालावे. बी उगवल्यानंतर गरजेप्रमाणे पाटाने पाणी द्यावे. खरीप कांद्याची रोपे ६ ते ७ आठवडयांनी व रबीची ८ ते ९ आठवडयांनी तयार होतात. रोपे काढण्यापूर्वी २४ तास अगोदर गादी वाफ्यास पुरेसे पाणी द्यावे. कांदयाची लागवड गादी वाफ्यावर तसेच सरी वरंब्यावर करता येते. सपाट वाफयामध्ये हेक्टरी रोपांचे प्रमाण जास्त असले तरी मध्यम आकाराचे एकसारखे कांद्याचे उत्पादन मिळते. सपाट वाफा दोन मीटर रूंद व उताराप्रमाणे वाफ्यांची लांबी ठेवावी . रोपांची लागवड सकाळी अथवा संध्याकाळी करावी . रोपांची लागवड १२.५ बाय ७.५ सेमी अंतरावर करावी.

**खते, पाणी व्यवस्थापन व आंतरमशागत :**

कांदा पिकास : ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश लागवडीच्या वेळी दयावे. त्यानंतर १ महिन्याने ५० किलो नत्र प्रति हेक्टरी दयावे. रासायनिक खतांचा वापर माती परीक्षणानुसार करावा. कांदा पिकाला नियमित पाणी देणे महत्वाचे असते . खरीप हंगामात १० ते १२ दिवसाच्या अंतराने तर उन्हाळी रबी हंगामात ६ ते ८ दिवसांनी जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाणी द्यावे. रोपांच्या लागवडीनंतर शेतात तण दिसल्यास हलकी खुरपणी करावी. काढणीपूर्वी ३ आठवडया अगोदर पाणी बंद करावे म्हणजे पानातील रस कांद्यामध्ये लवकर उतरतो आण माना पडून कांदा काढणीस तयार होतो .

**रब्बी हंगामासाठी जाती :**

**१) फुले सफेद :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाने हा वाण कागल भागातील पांढऱ्या कांद्याच्या पिकामधून विकसित केला आहे . १९९४ मध्ये हा वाण प्रसारित झाला. कांदे पांढरे, गोलाकार, मध्यम आकाराचे निर्यातीस योग्य, घन पांढरे, गोलाकार, मध्यम आकाराचे निर्यातीस योग्य, घन पदार्थांचे प्रमाण १३ % आहे. सरासरी उत्पादन हेक्टरी २५–३० टन एवढे मिळते .



**२) एन २–४–१ :** १९६० च्या दरम्यान निफाड येथील संशोधन केंद्राने विकसित केलेला हा वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या पिंपळगाव बसवंत येथील कांदा संशोधन केंद्राने रब्बी हंगामासाठी वाढवला आहे. या जातीचे कांदे गोलाकार , मध्यम ते मोठ्या आकाराचे असतात. कांद्याचा रंग विटकरी लाल असून साठवणीसाठी ही जात अत्यंत चांगली आहे. निर्यातीसाठी ही जात चांगली आहे. या जातीचे कांदे लागवडीनंतर १२० दिवसांनी काढणीला येतात. या जातीचे उत्पादन हेक्टरी ३० ते ३५ टन इतके मिळते. घन पदार्थचे प्रमाण १२–१३ % एवढे आहे. ह्या वाणाचे पीक रांगडा कांद्यासाठीही घेता येते.



**३) पुसा रेड :** नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान संस्थेने रब्बी हंगामासाठी ही जात निवड पद्धतीने १९७५ मध्ये विकसित केली आहे. या जातीच कांदा गोलाकार चपटा आणि गर्द लाल रंगाचा असतो. या जातीचे कांदे लागवडीनंतर १२५ ते १४० दिवसांत काढणीसाठी तयार होतात. या जातीचे उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन इतके मिळते. घन पदार्थांचे प्रमाण १२–१३ % आहे . महाराष्ट्रात रांगडा आणि रब्बी हंगामास योग्य वाण आहे .



**४) अर्का निकेतन :** बंगलोर येथील भारतीय बागवानी संशोधन संस्थेने ही जात नाशिक येथील स्थानिक वाणांतून १९८७ मध्ये विकसित केली आहे . या जातीचे कांदे गोलाकार, बारीक मानेचे आणि आकर्षक गुलाबी रंगाचे असतात. कांद्याची चव तिखट असून साठवणीसाठी चांगला राहतो. सर्वसाधारण तापमानाला ११० ते १२० दिवसात काढणीसाठी तयार होतात. या जातीचे उत्पादन हेक्टरी ३० ते ३५ टन येते. रब्बी आणि रांगडा या दोन्ही हंगामात या जातीची लागवड करता येते. घन पदार्थांचे प्रमाण १२ – १४ % आहे .



**५) ॲग्रीफाऊंड लाईट रेड :** रबी आणि उन्हाळी हंगामासाठी ही जात नाशिक येथील एन . एच . आर . डी . एफ . या संस्थेन विकसित केली आहे . या जातीचे कांदे फिकट लाल , गोल आणि मध्यम ते मोठ्या आकाराचे कांद्याची चव तिखट असते . या जातीचे उत्पादन हेक्टरी ३० ते ३२ टन इतके मिळते. साठवणीसाठी ही जात चांगली आहे. प्रामुख्याने नाशिक भागासाठी आणि निर्यातीसाठी ही जात योग्य आहे . घन पदार्थांचे प्रमाण १३–१४ % आहे .



**६) एन– २५७–९१ :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाने ही जात रबी हंगामासाठी विकसित केली आहे . या जातीचा कांदा पांढरा, मध्यम गोल आणि चपटा असतो . या जातीचे कांदे साठवणीत चांगले राहतात. कांदे लागवडीनंतर ११० ते १२० दिवसांत काढणीसाठी तयार होतात. उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन मिळते .



**७) ॲग्रीफाऊंड व्हाईट :** राष्ट्रीय बागवानी संशोधन आणि विकास प्रतिष्ठान ( एन . एच . आर . डी . एफ ) नाशिक ह्या संस्थेने ही जात मध्यप्रदेश राज्यात निमाड भागातील रबी हंगामात उत्पादन केल्या जाणाऱ्या स्थानिक वाणातून निवड पद्धतीने विकसित केली आहे. कांदे गोलाकार, आकर्षक पांढरा रंग , ४–६ सेंमी व्यासाचे असून घन पदार्थांचे प्रमाण १४–१५ % एवढे असते. साठवणक्षमता चांगली असून पीक पेरणीपासून १६०–१६५ दिवसांत तयार होते. सरासरी उत्पन्न २० –२५ मे टन प्रति हेक्टर एवढे असून खरीप व रब्बी दोन्ही हंगामात लागवडीसाठी योग्य वाण आहे .



**८) फुले सुवर्णा :** हा वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केला असून १९९७ साली महाराष्ट्रातील तिन्ही हंगामात घेण्यास शिफारस केली आहे . यलो टेक्सास आणि एन २–४–१ ह्या वाणांच्या संकरातून हा वाण विकसित केला आहे . कांदे पिवळ्या किंचित विटकरी रंगाचे, गोलाकार, घट्ट , मध्यम तिखट , निर्यातीस व साठवणीस योग्य, हा वाल ११० दिवसांत तयार होतो. सरासरी २३–२४ टन प्रति हेक्टर उत्पादन मिळते




**रोग व कीड :** कांदयावर प्रमुख रोग म्हणजे करपा हा रोग बुरशीपासून होतो. पातीवर लांबट गोल तांबूस चट्टे पडतात. शेंडयापासून पाने जळाल्यासारखी दिसतात. खरीप कांद्यावर या रोगाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर दिसून येतो. फूलकिडे किंवा अळया हेक्टरी अगदी लहान आकाराचे की टक पातीवरील तेलकट पृष्ठभागात खरडतात व त्यात स्त्रवणारा रस शोषतात. त्यामुळे पातीवर पांढरे ठिपके पडतात.

**काढणी आणि उत्पादन :** कांद्याची काढणी केल्यानंतर त्याची प्रतवारी करणे, कांदा सुकविणे, पात कापणे, बाजारभाव मिळेपर्यंत कांद्याची तात्पुरती साठवण करणे या गोष्टींकडे अनेकदा नीट लक्ष दिले जात नाही. केवळ कांद्याच्या लागवडी नंतर जात आणि हवामानानुसार कांदा ३ ते ५ महिन्यात काढणीस तयार होतो. कांदा पक्व झाल्यावर नवीन पाने येण्याचे थांबते. पानांतील अन्नरस कांद्यामध्ये उतरून कांदा घट्ट होऊ लागतो. पात पिवळसर होऊ लागते आणि गड्ड्याच्या वर आपोआप वाकून खाली पडते. यालाच 'माना पडणे' असे म्हणतात. या वेळी कांद्याची मुळे सुकू लागतात आणि त्यांची जमिनीची पकड सैल पडू लागते. साधारणपणे ३० ते ४० % झाडांच्या माना पडल्यानंतर कांदा काढणीस तयार झाला असे समजावे. सर्व कांदा एकाच वेळी काढणीला तयार होत नाही. मान पडल्यानंतर आणि पात सुकल्यावर कांदा काढावा. कांदा जसजसा तयार होईल तसतसे काढण्याचे काम खरीप हंगामात करतात कारण खरीप हंगामात माना लवकर पडत नाहीत. कांदा पक्व झाला तरीही पातीची वाढ चालूच राहते. अशावेळी पक्व कांदा बघून काढावा, परंतु रांगडा किंवा उन्हाळी कांदा काढणीला एकाच वेळी तयार होतो. या कांद्याची काढणी जानेवारी ते मे महिन्यापर्यंत चालते. या कांद्याच्या माना आपोआप पडतात. सर्व माना पडल्यानंतर कांदा एकाचा वेळी काढावा. कांद्याची पात ओलसर असतानाच कांदा उपटून काढावा. पात वाळली तर कांदा उपटून निघत नाही. अशा वेळी तो खुरप्याने किंवा कुदळीने काढावा लागतो. भारतात खरीप हंगामातील उत्पादकता प्रति हेक्टरी ८ टन आहे, तर रब्बी हंगामाची उत्पादकता प्रति हेक्टरी ११–१६ टन आहे.

**ठिबक सिंचन वापरून कांदा उत्पादन :** ठिबक सिंचनावर कांदा लागवड करावयाची झाल्यास त्यासाठी १५० ते १८० सें.मी. रुंदीचे गादेवाफे तयार करावेत. एका वाफ्यावर दोन लॅटरल ६० सें.मी. अंतरावर पसरवून घ्याव्यात. दोन ड्रीपमध्ये ६० सें.मी. अंतर ठेवावे. वाफ्यावर ठिबक संच चालवून वाफसा येईपर्यंत पाणी द्यावे आणि वाफसा आल्यावर १० बाय १० सें.मी. अंतरावर लागवड करावी. कांद्याची लागवड मध्यम, भारी, कसदार आणि भुसभुशीत जमिनीत करावी. पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या आणि सेंद्रिय पदार्थाचे भरपूर प्रमाण असणाऱ्या जमिनीत कांद्याचे पीक चांगले येते.

**सरी – वरंब्यामध्ये/सपाट वाफ्यांमध्ये रोपांची पुनर्लागवड :** रोपे गादीवाफ्यांवर तयार करून त्यांची पुनर्लागवड करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. रोपे सपाट वाफ्यात किंवा सरी वरंब्यावर लावली जातात. सपाट वाफ्यातील लागवड सरी वरंब्यापेक्षा जास्त फायदेशीर ठरते. कारण सपाट वाफ्यामध्ये रोपांची संख्या सरी वरंब्यापेक्षा जास्त बसते. रोपांच्या वाढीला चांगला वाव मिळतो. पाणी सारखे बसते, खुरपणी आणि वरखतांची मात्रा देणे इत्यादी कामे सोपी होतात. लहान किंवा चिंगळी कांद्याचे प्रमाण सरी – वरंब्यावर केलेल्या कांद्याच्या तुलनेत कमी राहते. सरी – वरंब्यामध्ये मध्यावर ४५ बाय १० सें.मी. रोपे लागवड करावी. सरीच्या वरच्या भागात लावलेला कांदा चांगला पोसतो, तर तळातील कांदा लहान राहतो. खरिपात ज्या शेतामध्ये पाण्याचा निचरा होत नाही, अशा जमिनीत मात्र लागवड सरी – वरंब्यावर करावी. जमिनीचा उतार बघून २ मीटर रुंद आणि ३ ते ५ मीटर लांबीचे वाफे तयार करावेत. जमीन सपाट असेल तर वाफ्यांची लांबी आणखी वाढवता येते. सपाट वाफ्यामध्ये लागवड नेहमी कोरड्या जमिनीत करावी आणि नंतर पाणी द्यावे. सरी वरंब्यात वाफ्यांना पाणी दिल्यानंतर लागवड करावी, गादीवाफ्यावर लागवड करून कांद्याचे पीक घेता येते. लागवडीपूर्वी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.